## ज.भ.शि.प्र.मंडळाचे,

# कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,

## शिवाजीनगर, गढी.

### बी.ए.तृतीय वर्षे - पेपर - XI

### विषय :- मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा इतिहास


**प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे (सहाय्यक प्राध्यापक)**

मराठी विभाग

# मराठी वाङमयाचा इतिहास

महाराष्ट्र ही संतची आणि वीरांची भूमी आहे. भारतीय संस्कृतीचे आणि उदात्त जीवनमूल्यांचे अधिष्ठान बहुभाषीय भारतीय साहित्याला लाभले आहे. इतर प्रदेशांपेक्षा महाराष्ट्र ाची प्रकृती मूलत: भिन्न आहे. इथे वीरत्व आणि वैराग्याच्या  परंपरा येथे एकत्र नांदल्या आहेत. त्यामुळे मराठीची साहित्यगंगा प्रवृत्ती आणि निवृत्तीच्या काठाकाठाने वाहिली आणि लोक जीवनाला तिने संपन्नता प्राप्त करुन दिली. मराठी मन,मराठी संस्कृती यांची साक्ष देणा-या या प्राचीन मराठी साहित्याचा विशाल पट उलगडून दाखवला आहे.





प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे
(सहाय्यक प्राध्यापक) मराठी विभाग

## आद्य कवी मुकुंदराज

मुकुंदराज मराठीतील आद्य कवी  म्हणून ओळखले जाते. यांच्या जन्म स्थल कालाविषयी अभ्यासकामध्ये मतभेद असले तरी मराठी साहित्य लेखनाची सुरुवात केली. संस्कृत भाषा आणि तत्वज्ञान यांचा त्याग करुन  सर्वसामान्य लोकांना समजेल अशा भाषेतून साहित्य निर्मिती करण्याचे बहुमोल कार्य त्यांनी केले. मराठी साहित्यातील योगदानामुळे त्यांना आद्यकविकीर्ती मुकुंदराज तर कुणी मराठी वाङमयाच्या पहाटेचा शुक्रतारा असे संबोधले आहे.

लेखनकार्य

- विवेकसिंधु
- परमामृत
- पवनविजय



प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे (सहाय्यक प्राध्यापक)  मराठी विभाग

## ❖ महानुभाव पंथ


मुकुंदराजानंतर व ज्ञानेश्वरांच्या काही काळ अगोदर महानुभाव संप्रदाय महाराष्टात उदयास येऊन मराठी गद्य वाङमयाचे व्यासपीठ तयार झाले. महानुभाव पंथाचे मूळ पुरुष श्रीगोंविदप्रभू तर पंथाचे प्रणेते चक्रधर स्वामी आहेत. त्यांचा शिष्य संप्रदाय व त्यांचे कार्य महान आहे. त्यांचे साहित्य हे गद्य आणि पद्य स्वरुपात पहायला मिळते. पंथाचे तत्वज्ञान आणि आचारधर्म हे सर्व सामान्य लोकांना कळेल असेच आहे.

### गद्य वाङमय

- लिळाचरित्र
- गोंविदप्रभूचरित्र
- दृष्टांतपाठ
- सूत्रपाठ
- मूर्तिप्रकाश
- स्मृतिस्थळ

### पद्यवाङमय

- रुक्मिणीस्वयंवर
- शिशुपालवध
- उध्दवगीता
- वच्छाहरण
- ज्ञानप्रबोध
- सहयाद्रीवर्णन
- ऋध्दिपूरवर्णन




प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे (सहाय्यक प्राध्यापक) मराठी विभाग

## ▪ संत ज्ञानेश्वर - 1275 ते 1296

महाराष्टातील वारकरी संप्रदायातील महत्वाचे संत. भागवत धर्माचा पाया रचण्याचे अभूतपतर्व कार्य त्यांनी केले. अध्यात्माच्या क्षेत्रात समानता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला, सर्व जातीधर्माच्या लोकांना वारकरी संप्रदायात सामावून घेतले. सर्व सामान्य लोकांना समजेल अशा मराठी भाषेत लेखन करुन मराठी भाषेविषयीचा अभिमान, मराठीची महती साध्या आणि सोप्या भाषेत सांगितली.

**निर्जीव दगडांची काय करिसी सेवा I तो तुज निर्देवा देईल काय II**
**कवणें गुणें भुली पडली गव्हारा I तीर्थाच्या माहेरा नोळखिसी II**
**अष्ठोत्तरशें तीर्थे जयाच्या चरणी I**

या अभंगात ते म्हणतात, अरे वेडया ह्रदयरुपी मंदिरात परमात्मा वास करीत असताना त्याला विसरुन हा दगडच देव आहे असे समजून त्याची सेवा करीत बसला आहेस एकशे आठ तीर्थ ज्याच्या चरणा जवळ आहेत असा परमात्मा तुझ्या ह्रदयातच आहे. तीर्थ भ्रमण करुन काय उपयोग असा संदेश देतात.




प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे
(सहाय्यक प्राध्यापक) मराठी विभाग

## ▪ संत नामदेव :- (1270 ते 1350 )

महाराष्टातील वारकरी संप्रदायातील श्रेष्ठ संतकवी होते. हे मराठीतील पहिले चरित्रकार व आत्मचरित्रकार आणि कीर्तनाच्या माध्यमातून भागवत धर्माची पताका पंजाबपर्यंत नेणारे आद्य प्रचारक होते. प्रतिकूल परिस्थितीमध्ये महाराष्टाची भावनिक एकात्मता जपण्याचे अवघड काम केले . सगुण भक्तीत रमून निर्गुणाची शिकवण समाजाला देणारे व मानवतेची उपासना करणारे संत म्हणून प्रसिध्द असल्यामुळे त्यांना वारकरी संप्रदायात महत्वाचे स्थान होते.




देहाचें ममत्व नाहीं जों तुटलें I विषयी किटलें मन नाहीं II
तंव नित्य सुख कैसेंनि आतुडे I नेणती बापुडे प्रेमसुख II
मीच एक भक्त मीच एक मुक्ता I म्हणती पतित दुराचारी II
नामा म्हणे तुझे कृपेविण देवा I केंवि जोडे ठेवा विश्रांतीचा II



प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे
(सहाय्यक प्राध्यापक) मराठीविभाग

# संत जनाबाई

या वारकरी संप्रदायातील महत्वाच्या संत कवयित्री. संत वाटिकेतील जाईची वेल म्हणून प्रसिध्द. जनबाई स्वत:ला नामयाची जनी म्हणत असे. त्यांचे अभंग सर्वांगसुंदर भावगीतच आहेत. विठ्ठलोपासनेची नामभक्ती आणि स्त्रीमनाचा हळुवारपणा त्यांच्या अभंगात पहाचला मिळतो.

पक्षी जाय दिगंतरा I बाळकांसी आणी चारा II
घार हिंडते आकाशी I झाप घाली पिल्लापासीं II
माता गुंतली कामासी I चित्त तिचे बाळापाशी II
वानर हिंडे झाडावरर I पिली बांधुनी उदरी II
तैसी आम्हांसी विठठल माये I जनी वळोवेळां पाहे II




प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे
(सहाय्यक प्राध्यापक) मराठीविभाग

## संत एकनाथ :- ( 1533 ते 1599 )

संत एकनाथ हे संत-पंत-तंतकवी होते. भगवद्‌भक्तीचा वारसा त्यांच्या घरातूनच मिळाला. ते सदैव विठ्ठलोपासनेत लीन राहायचे. मराठी भाषेत विपूल साहित्य निर्मिती केली. आपल्या साहित्याद्वारे जनतेचे रंजन व प्रबोधन केले. समजातील अनिष्ठ प्रथा, अंधश्रध्दा निर्मुलन आणि जातियतेच्या विरोधात काम करुन डोळस आणि कृतीशील समाज निर्मितीसाठी प्रयत्न केले. ते एका जनार्दन म्हणून स्वत:चा उल्लेख करतात. एका जनार्दनी ही त्यांची नाममुद्रा आहे.

जें जें दृष्टीं दिसे ते ते हरिरुप I पूजा ध्यान जप त्यासी नाही II
वैकुंठी कैलासी तीर्थक्षेत्री देव I तयाविण ठाव रिता कोठें II
वैष्णवांचे गुह्य मोक्षाचा एकांत I अनंतासी अंत पाहता नाही II
आदि मध्ये अंती अवघा हरि एक I एकचि अनेक एक हरि II
एकाकार झाले जीव शिव दोन्ही I एका जनार्दनी ऐसे केले II



प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे (सहाय्यक प्राध्यापक) मराठी विभाग

# संत तुकाराम :- (1608 ते 1650 )

वारकरी संप्रदायातील शेवटचे आणि महत्वाचे संत. तुकाराम महाराज हे साक्षात्कारी व निर्भिड संत कवी होते. त्यांची अभंग गाथा म्हणजे अखंड ज्ञानाचा स्त्रोत आहे. त्यांचे अभंग महाराष्टाच्या सांस्कृतिक परंपरेचे द्योतक आहेत. आपल्या लेखनीच्या माध्यमातून सर्व सामान्य लोकांना नवा धर्म, नवी भाषा आणि नवी दिशा देण्याचे काम यांनी केले. त्यांचे साहित्य म्हणजे आध्यात्मिक ज्ञानाचा आधारवड आहे. आपल्या लेखनीने महाराष्टच्या सांस्कृतिक जीवनाची बाग फुलविली आहे.

जोडोनियां धन उत्तम वेव्हारें I उदास विचारें वेच करी II
उत्तम चि गती तो एक पावेल I उत्तम भोगील जीव खाणी II
परउपकारी नेणें परनिंदा I परस्त्रिया सदा बहिणी माया II
भूतदया गाईपशूचें पालन I तान्हेल्या जीवन वनमाजी II
शांतिरुपें नव्हे कोणाचा वाईट I वाढवी महत्व वडिलांचें II
तुका म्हणे हेंचि आश्रमाचें फळ I परमपद बळ वैरागयाचें II




प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे (सहाय्यक प्राध्यापक) मराठी विभाग

## ❖ शाहिरी वाङमय

शाहिरी वाङमय म्हणजे मुख्यत: पोवाडे, लावण्या आणि लावण्यातच मोडणारी भेदिक कवने यांचा समावेश शाहिरी वाङमयात होतो.

**शाहिरी वाङमयाचे प्रकार :- 1. पोवाडे 2. लावणी**

**पोवाडा :-** पोवाडा हा अस्सल मराठी वाङमयप्रकार असून तो तेराव्या शतकात उदयास आला आणि सतराव्या शतकापर्यंत टिकून राहिला. पोवाडा हा दृश्य, श्राव्य प्रकार आहे. पोवाडा म्हणजे वीरांच्या पराक्रमांचे,विव्दानांच्या बुध्दिमतेचे तसेच एखादयाच्या सामर्थ्य,गुण, कौशल्य इ. गुणवर्णन करण्यासाठी पोवाडा हा वाङमय प्रकार उदयास आला.





# लावणी वाङ्मय

लावणी हा महाराष्टातील कलाप्रकार आहे. लावणी कित्येकदा तमाशाचा हिस्सा म्हणूनही सादर करतात.लवण म्हणजे सुंदर. लवण या शब्दावरुन लावण्यगीत वा लावणी शब्द तयार झाला आहे. लावणी हा कलाप्रकार शृंगार व भक्ती या रसांचा परिपोष करण्यासाठी पूरक माध्यम समजले जाते. महाराष्ट् राज्याच्या लोकसंस्कृतीचे महत्वाचे वैशिष्टये म्हणजे लावणी होय.



प्रकार - 1. नृत्यप्रधान लावणी

2. बैठकीची लावणी

3. फडाची लावणी



# धन्यवाद.....!

प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे (सहाय्यक प्राध्यापक) मराठी विभाग